# प्रेस नोट

## नागपूर महानगरपालिकेचा राजस्व निरीक्षक आणि खाजगी इसम ३,०००/- रुपयांची लाच घेतांना कारवाई

नागपूर महानगरपालिका, हनुमान नगर (झोन क्र. ३),नागपूर येथील राजस्व निरीक्षक श्री. प्रमोद वसंतकुमार मोगरे (५० वर्षे) आणि एक खाजगी इसम श्री. राकेश नरेन्द्र दोडके (३४ वर्षे) यांना ३,०००/- रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी रंगेहाथ पकडले.

तक्रारदार यांनी रामेश्वरी परिसरात एक फ्लॅट खरेदी केला होता. या फ्लॅटचा टॅक्स स्वत:च्या नावे करण्यासाठी त्यांनी हनुमान नगर झोन कार्यालयात कागदपत्रे जमा केली होती, या कामाच्या व्हेरीफिकेशनसाठी आलेल्या कर्मचा-यांपैकी श्री. राकेश दोडके याने तक्रारदाराला फोन करून सांगितले की, तुम्हाला दरवर्षी ४,५००/- रुपये टॅक्स लागणार आहे, तो कमी करून १,८००/- रुपये करून द्यायचा असेल तर मला आणि माझे साहेब श्री. प्रमोद मोगरे यांना ३,५००/- रुपये द्यावे लागतील.

तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर कडे तक्रार नोंदवली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सापळा पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये ३,५००/- रुपयांच्या मागणीपैकी तडजोडीनंतर ३,०००/- रुपये स्वीकारण्याचे ठरले. त्यानुसार रचलेल्या सापळ्यात आरोपी क्रमांक २ श्री. राकेश दोडके याला आरोपी क्रमांक १ श्री. प्रमोद मोगरे यांच्या सांगण्यावरून ३,०००/- रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.

दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन हुडकेश्वर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ आणि ७ अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन तपास सुरू आहे.

सदर यशस्वी सापळा कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर चे पोलीस अधीक्षक डॉ. श्री. दिगंबर प्रधान, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी बाविस्कर आणि श्री. विजय माहुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सदरची कार्यवाही ही पोलीस निरीक्षक श्री. विवेक पडघान, मपोहवा कांचन गुलबासे, पोशि. विकेश राउत, पोशि. सचिन किन्हेकर आणि चापोशि प्रिया नेवारे सर्व नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे जनतेला आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कामासाठी कोणाही लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्यांच्या विरुद्ध निर्भयपणे पुढे येऊन तक्रार नोंदवावी.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा**

१. पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. 0712-2561520,
२. टोल फ्री क्रमांक : १०६४ / व्हॉटसअॅप क्र. 9067671064
३. डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो. क्र. 9923185566
४. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो. क्र. 7038436441
५. श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो. क्र. 9923142569
६. श्री. राजीव कर्मलवार, पोलीस निरीक्षक, वाचक लाप्रवि नागपूर मो. क्र. 9021452760